**राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत (RKVY) परंपरागत कृषि विकास योजना (PKVY) सन २०२३-२४ या चालू आर्थिक वर्षात ८५० गटांकरिता राबविण्यास वार्षिक कृती आराखड्यास प्रशासकीय मान्यता देणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

**कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्सव्यवसाय विभाग**

**शासन निर्णय क्रमांक : योजना ३३२३/प्र.क्र.१२२/१-अे**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, विस्तार, मुंबई- ४०००३२
दिनांक : २० ऑक्टोबर, २०२३.

**वाचा** :- १) केंद्र शासनाने www.agricoop.nic.in या सांकेतिक स्थळावर निर्गमित केलेल्या राष्ट्रीय कृषि विकास योजना (RKVY) परंपरागत कृषि विकास योजनेबाबतच्या मार्गदर्शक सूचना.

२) राष्ट्रीय कृषि विकास योजनेच्या राज्यस्तरीय प्रकल्प मंजूरी समीतीच्या इतिवृत्ताचे पत्र क्र. RKV-०१२३/CR-१३/१४-A, दिनांक ३० मे, २०२३.

३) कृषि आयुक्तालयाचे जा.क्र. कृ.आ./पीकेव्हीवाय/८५०/प्रमाप्र/२८३३६/२०२३, दिनांक २०.०८.२०२३ चे पत्र.

**प्रस्तावना :-**

सन २०१६-१७ पासून राज्यात राष्ट्रीय शाश्वत शेती अभियानांतर्गत परंपरागत कृषि विकास योजना हि गट आधारीत सेंद्रिय शेती योजना केंद्र हिस्सा ६०% व राज्य हिस्सा ४०% याप्रमाणात राज्यात राबविण्यात येत आहे. योजनेच्या माध्यमातून व्यावसायिक सेंद्रिय शेतीस व सेंद्रिय निविष्ठा वापरण्यास प्रोत्साहन देणे, सेंद्रिय प्रमाणिकरण करणे, शेतकऱ्यांच्या शेतावर सेंद्रिय निविष्ठा तयार करणे, रासायनिक किटकनाशके उर्वरीत अंशमुक्त शेतमाल ग्राहकास उपलब्ध करुन देणे, सेंद्रिय शेती ग्राम विकसित करणे तसेच शेतीवर आधारीत प्रशिक्षण व प्रात्यक्षिक घेणे, कमी खर्चाच्या तंत्रज्ञानाचा अवलंब करुन शेतकऱ्यांना उत्पादन खर्च कमी करुन आर्थिक उत्पन्न वाढविणे याबाबी योजनेत समाविष्ट आहे. सदर योजने अंतर्गत एकुण २१२८ गटांची स्थापना करण्यात आलेली आहे.

सन २०२३-२४ मध्ये नविन ८५० गटांची स्थापना करुन योजनेची अंमलबजावणी करण्यात येत आहे. सदर योजना गटआधारीत असून २० हेक्टर क्षेत्राचा एक गट याप्रमाणे गट स्थापन करण्यात येत आहेत. योजनेअंतर्गत एकदा निवड केलेल्या गट/लाभार्थीस ३ वर्षे लाभ देण्यात येतो.

सन २०२२-२३ पासून परंपरागत कृषि विकास योजना ही योजना राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत राबविण्यात येत आहे. याअनुषंगाने राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत (RKVY) परंपरागत कृषि विकास योजना (PKVY) सन २०२३-२४ या चालू आर्थिक वर्षात ८५० गटांकरिता राबविण्यास वार्षिक कृती आराखड्यास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत, परंपरागत कृषि विकास योजना सन २०२३-२४ या चालू आर्थिक वर्षात ८५० गटांसाठी राबविण्याकरीता प्रवर्गनिहाय खालील वार्षिक कृती आराखड्यास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

| प्रवर्ग | केंद्र हिस्सा (६० टक्के) | राज्य हिस्सा (४० टक्के) | एकूण |
|---|---|---|---|
| **सर्वसाधारण** | ८९६.८२ | ५९७.८८ | १४९४.७१ |
| **अनुसूचित जाती** | ७८.०३ | ५२.०२ | १३०.०५ |
| **अनुसूचित जमाती** | ६५.५५ | ४३.७० | १०९.२४ |
| **एकूण** | **१०४०.४०** | **६९३.६०** | **१७३४.००** |

२) सदर निधी वरील परिच्छेद मध्ये प्रदान केलेल्या प्रशासकीय मान्यतेनुसार खर्च करण्यात येईल याची दक्षता घेण्यात यावी. या प्रित्यर्थ होणारा खर्च मंजूर होणाऱ्या अनुदानातून भागविण्यात येऊन पुढील लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

**सर्वसाधारण प्रवर्ग :-**

| केंद्र हिस्सा लेखाशिर्ष | राज्य हिस्सा लेखाशिर्ष |
|---|---|
| **मागणी क्रमांक -डी-३**<br>२४०१ पीक संवर्धन,<br>(००) (३५) कृषी उन्नती योजना - परंपरागत कृषि विकास योजना (केंद्र पुरस्कृत योजना),<br>**केंद्र हिस्सा- ६०%,**<br>**२४०१ ए ०५६** कार्यक्रम, ३३ अर्थसहाय्य. | **मागणी क्रमांक -डी-३**<br>२४०१ पीक संवर्धन,<br>(००) (३६) कृषी उन्नती योजना - परंपरागत कृषि विकास योजना (केंद्र पुरस्कृत योजना),<br>**राज्य हिस्सा -४० %,**<br>**२४०१ ए ०६५** कार्यक्रम, ३३ अर्थसहाय्य. |

अनुसुचित जाती प्रवर्ग-

| केंद्र हिस्सा लेखाशिर्ष | राज्य हिस्सा लेखाशिर्ष |
|---|---|
| मागणी क्रमांक-एन-३,<br>२४०१ पिक संवर्धन,<br>(००) ७८९, **अनुसूचित जाती उपयोजना**<br>(०१) **अनुसूचित जाती घटक कार्यक्रमांतर्गत योजना**<br>(०१) (१३) कृषि उन्नती योजना-परंपरागत कृषि विकास योजना (केंपुयो),<br>**केंद्र हिस्सा-६०%**<br>**२४०१ बी२०३,**<br>योजनांतर्गत ३३-अर्थसहाय्य | मागणी क्रमांक-एन-३,<br>२४०१ पिक संवर्धन,<br>(००) ७८९, **अनुसूचित जाती उपयोजना**<br>(०१) **अनुसूचित जाती घटक कार्यक्रमांतर्गत योजना**<br>(०१) (१४) कृषि उन्नती योजना-परंपरागत कृषि विकास योजना (केंपुयो),<br>**राज्य हिस्सा-४०%**<br>**२४०१ बी२१२,**<br>योजनांतर्गत ३३-अर्थसहाय्य |

**अनुसुचित जमाती प्रवर्ग-**

| केंद्र हिस्सा लेखाशिर्ष | राज्य हिस्सा लेखाशिर्ष |
|---|---|
| मागणी क्रमांक- टी-५,<br>२४०१ पिक संवर्धन,<br>७९६,**जनजाती क्षेत्र उपयोजना**<br>०१ - जनजाती क्षेत्र उपयोजनेंतर्गत योजना<br>(०१)(३०) कृषि उन्नती योजना-परंपरागत कृषि विकास योजना (केंपुयो),<br>**केंद्र हिस्सा-६०%**<br>**(२४०१ ए७६२),** ३३- अर्थसहाय्य | मागणी क्रमांक- टी-५,<br>२४०१ पिक संवर्धन,<br>७९६,**जनजाती क्षेत्र उपयोजना**<br>०१ - जनजाती क्षेत्र उपयोजनेंतर्गत योजना<br>(०१)(३१) कृषि उन्नती योजना-परंपरागत कृषि विकास योजना (केंपुयो),<br>**राज्य हिस्सा-४०%**<br>**(२४०१ ए७७१),** ३३- अर्थसहाय्य |

४. सदर योजना राबविताना खालील अटी व शर्तींचे पालन करण्यात यावे-

१) सदर योजना केंद्र शासनाच्या संदर्भाधिन मार्गदर्शक सुचनानुसार व केंद्र शासनाच्या निधी वितरीत करण्याच्या अटी व शर्ती नुसार राबविण्यात यावी.

२) खर्चाचे लेखे सुव्यवस्थित ठेवून सदर खर्चाचे लेखा परिक्षण अहवाल व उपयोगिता प्रमाणपत्रे केंद्र व राज्य शासनाला लवकरात लवकर प्रगती अहवालासह सादर करण्यात यावेत. योजनेच्या वेगवेगळ्या बाबींवरील भौतिक व आर्थिक प्रगती अहवाल केंद्र व राज्य शासनास प्रत्येक महिन्याच्या १० तारखेपर्यंत सादर करण्यात यावा.

३) योजनेशी संबंधित ताळेबंद व लेखापरिक्षण जमा खर्चाच्या रकमा यांचा अहवाल अंमलबजावणी यंत्रणेने द्यावा. त्यामध्ये वर्षाच्या सुरूवातीला अखर्चीत रकमा व व्याजाद्वारे मिळालेले उत्पन्न स्पष्टपणे नमूद करण्यात यावे. जेणेकरून पारदर्शी स्वरूपात रकमा विचारात घेता येतील व संदिग्धता राहणार नाही.

४) कोणत्याही परिस्थितीत मंजूर कार्यक्रमापेक्षा जास्तीचा कार्यक्रम राबविला जाणार नाही याची दक्षता घ्यावी.

५) सदर निधी खर्च करताना विहित कार्यपद्धती अनुसरून सर्व वित्तीय कायदे/टेंडर नियमावली व नियमांचे/प्रक्रियेचे/वित्तीय अधिकारांच्या मर्यादेत/P.W.D / मॅन्युअलचे अधिन राहून/C.V.C.तत्वानुसार/CAG च्या निर्देशानुसार/प्रचलित शासन निर्णय/नियम/परिपत्रक/ तरतुदी नुसार, बजेट व कोषागार नियमावली नुसार खर्च करण्याची कार्यवाही अमंलबजावणी यंत्रणांनी करावी. कोणत्याही परिस्थितीत कुठलाही शासन नियम/अधिकाराचा भंग होणार नाही, याबाबत दक्षता घेण्याची जबाबदारी संबंधित क्षेत्रिय कार्यालयाची राहील.

६) वेळोवेळी शासन निर्णयान्वये वितरीत केलेला सर्व निधी पीएफएमएस (PFMS) मधील SNA प्रणालीव्दारे वितरीत करण्याची कार्यपध्दती बंधनकारक राहील.

७) सदर योजनेकरिता प्रवर्गनिहाय कार्यक्रमास मान्यता देण्यात आलेली असून संबधित संवर्गाच्या लाभार्थ्यांसाठी खर्च करण्यात येईल याची दक्षता घेण्यात यावी. तसेच केंद्र हिश्श्यास अनुसरून समरूप राज्य हिस्सा खर्च होईल याची दक्षता घेण्यात यावी.

५. सदर योजनेकरिता कृषि संचालक, आत्मा, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना योजनेचे नियंत्रण अधिकारी म्हणून व सहाय्यक संचालक, लेखा-१ यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

६. प्रस्तुतचे आदेश वित्तीय अधिकार नियम पुस्तिका,१९७८मधील भाग-पहिला, उपविभाग तीन मधील अनुक्र.४ येथील नियम २७ (२) (ब) अन्वये प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांमध्ये काढण्यात येत आहे.तसेच वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक अर्थसं - २०२३/प्र.क्र.४०/अर्थ-३, दिनांक १२.०४.२०२३ अन्वये दिलेल्या मंजूरीनुसार विभागाच्या स्तरावर निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.inया संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२३१०२०१६२०३३९३०१ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

UMESH NARAYAN CHANDIWADE

Digitally signed by UMESH NARAYAN CHANDIWADE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=AGRICULTURE AND ADF DEPARTMENT, 2.5.4.20=0a3a08c7339c487fe2836238383bf91bbd037b93b4bdf6c8e95d1969e585fffe, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=CCBE80FCC6B64503B4E8B1269BD88D631F3F3C2BEF6E1CA70CC9A4E30954011F, cn=UMESH NARAYAN CHANDIWADE
Date: 2023.10.20 16:24:16 +05'30'

**( उमेश चांदिवडे )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा.मंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा.राज्यमंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा/ विधानपरिषद यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ, मुंबई.
४. प्रधान सचिव (कृषि) यांचे स्वीय सहायक, कृषि व पदुम विभाग,मंत्रालय,मुंबई.
५. आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
६. सहसचिव (निविष्ठा व गुणनियंत्रण), कृषि पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. सर्व कृषि संचालक, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
८. महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखा परिक्षा/ लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/ नागपूर .
९. सर्व विभागीय कृषि सहसंचालक
१०.प्रकल्प संचालक, डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन, अकोला
११.सर्व प्रकल्प संचालक (आत्मा)
१२.सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
१३.सहाय्यक संचालक, लेखा-१, कृषि आयुक्तालय महाराष्ट्र राज्य, पुणे.
१४.कार्यासन १४३१,नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१५.कार्यासन व्यय-१,वित्त विभाग, मंत्रालय,मुंबई.
१६.निवडनस्ती (कार्यासन १-अे), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय,